# राष्ट्रीय आरोग्य अभियान, आरोग्य विभाग, जिल्हा परिषद, सिंधुदुर्ग

| | |
|---|---|
| दूरध्वनी क्र.-०२३६२-२२८५६८ 923 | Mail- dpmnrhmsindhudurg@gmail.com |
| जा.क्र.सिंजिप/आवि/राआअ-जिकाव्यक/ /20-21 | दिनांक 04 / 02 /2020-21 |

## पदभरतीजाहिरात

**राष्ट्रीय आरोग्य अभियान, आरोग्य विभाग, जिल्हा परिषद, सिंधुदुर्ग** अंतर्गत खालीलप्रमाणे पदभरती जाहिर करणेत येत आहे. कार्यक्रम सहाय्यक (सांख्यिकी) /तालुका मुल्यमापन व संनियंत्रण अधिकारी, नर्सिंग प्रशिक्षक, पर्यवेक्षक, कार्यक्रम समन्वयक, स्टाफ नर्स, लेखापाल व समुपदेशक या पदांची भरती निव्वळ कंत्राटी पदृधतीने करणेत येत आहे. उपरोक्त नमुद करणेत आलेल्या पदांबाबत निवडीच्या अटी व शर्ती तसेच इतर आवश्यक ती सर्व माहिती जिल्हा परिषद संकेतस्थळ **www.zpsindhudurg.maharashtra.gov.in** यावर पाहण्यास उपलब्ध आहे. तरी पात्र व्यक्तीनीं संकेतस्थळावरील जाहिरातीत नमुद केलेल्या कागदपत्रासह व संकेतस्थळावरील अर्जाचा नमुना सुचित केलेप्रमाणे भरुन कार्यवाही करणेची आहे.

अध्यक्ष<br>
सिंधुदुर्ग जिल्हा एकात्मिक आरोग्य व<br>
कुटुंब कल्याण सोसायटी ( कार्यकारी समिती) तथा<br>
मुख्य कार्यकारी अधिकारी<br>
जिल्हा परिषद, सिंधुदुर्ग

सिंधुदुर्ग जिल्हा एकात्मिक आरोग्य व कुटुंब कल्याण सोसायटी
राष्ट्रीय आरोग्य अभियान, आरोग्य विभाग, जिल्हा परिषद, सिंधुदुर्ग

जा.क्र.सिंजिप/आवि/राआअ-जिकाव्यक/१२५/2020-21          दिनांक 05/02/2020-21

राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत सिंधुदुर्ग जिल्हा एकात्मिक आरोग्य व कुटुंब कल्याण सोसायटी अधिनिस्त खालीलप्रमाणे नमुद करणेत आलेली रिक्त पदे 11 महिने कालावधीसाठी कंत्राटी पदृधतीने भरणेकरिता ~~ऑनलाईन पदृधतीने~~ अर्ज खाली नमुद करणेत आलेल्या तारखेला मागविणेत येत आहेत

सहसंचालक (अतांत्रिक) राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई यांचे पत्राचा क्रमांक राआसो/ मनुष्यबळ/ आरक्षण/२४५४६-७७४/ २०१६. दिनांक २०/०७/१६ मध्ये नमुद केलेनुसार अपेक्षित राखीव प्रवर्गाचे उमेद्वार पुरेशा प्रमाणात उपलब्ध न झाल्यास रिक्त पदांच्या भरतीची आवश्यकता लक्षात घेऊन प्रतिक्षा यादीवरील खुल्या प्रवर्गातील उमेद्वारांना तात्पुरती नियुक्ती देणेबाबत सुचित आहे. जाहिरातीमध्ये दर्शविलेलेल्या पदांमध्ये काही नियुक्त्या सामाजिक प्रवर्गातील उमेद्वार उपलब्ध न झालेमुळे खुल्या प्रवर्गातुन तात्पुरत्या स्वरुपात करणेत आलेल्या आहेत. त्यामुळे जहिरातीमध्ये दर्शविलेल्या शैक्षणिक अर्हतेनुसार पात्र असलेल्या सामाजिक प्रवर्गातील उमेद्वारांनीच अर्ज सादर करावयाचे आहेत. इतर सामाजिक प्रवर्गातील उमेद्वारांच्या अर्जाची दखल घेणेत येणार नाही. याची उमेद्वारांनी नोंद घेणेची आहे.

| अ.क्र. | मुळ संवर्ग | मुळ संवर्गातील योजनानिहाय पद | शैक्षणिक अर्हता व अनुभव | प्रवर्ग | पदांची संख्या | मासिक मानधन रु. |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | कार्यक्रम सहाय्यक - सांख्यिकी /तालुका मुल्यमापन संनियंत्रण अधिकारी | आरोग्यवर्धिनी केंद्र (HWC) | **Graduation in Statistics or Mathematics With MSCIT** | इमाव | 1 | रु.18,000/- |
| 2 | नर्सिंग प्रशिक्षक | **नर्सिंग स्कुल** | **BSC Nursing (Maharashtra Nursing Council Registration) with 2 Years Experience** | अनु.जाती | 1 | रु. 25,000/- |
| 3 | पर्यवेक्षक | **आरएनटीसीपी- 1 पद** | **Any Graduate With Typing Skill Marathi 30 & English 40 Words per minute & MSCIT with 1 Year Experience** | अनु.जमाती | 1 | रु. 20,000/- |
| 4 | **कार्यक्रम समन्वयक** | **आशा योजना - 1 पद<br>आरएनटीसीपी- 1 पद** | **MSW or MA in Social Sciences With 2 yrs Experience** | अनु.जाती<br>खुला | 1<br>1 | रु. 20,000/- |
| 5 | स्टाफ नर्स | **एनसीडी/ एसएनसीयू/डायलेसिस** | **GNM/ BSC Nursing (Maharashtra Nursing Council Registration)** | विजा- अ<br>भज-ड<br>ईडब्ल्यूएस | 2<br>3<br>2 | रु. 20,000/- |
| 6 | **लेखापाल** | **तालुका कार्यक्रम व्यवस्थापन कक्ष- 1 पद** | **B. Com with Tally Certification & Preference for Typing Marathi & English** | **भज- क** | 1 | **रु.18,000/-** |
| 7 | **समुपदेशक ( Counselor )** | एनपीसीडीसीएस- **2 पदे** | **MSW with 1 Year Experience** | विजा- अ<br>खुला | 1<br>1 | रु. 20,000/- |

**अटी व शर्ती खालीलप्रमाणे-**

१) मा. आयुक्त आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान मुंबई यांचे नियमित प्राप्त होणा-या भरतीबाबतचे मार्गदर्शक सुचनांचा अवलंब करणेत येईल याची पात्र उमेद्दवारांनी नोंद घ्यावी.

२) उपरोक्त पदे ही निव्वळ कंत्राटी असुन राज्य शासनाची नियमित पदे नाहीत. शासकीय नियमित सेवेत सामावून घेणेबाबत किंवा शासनाकडे सेवा संरक्षणासाठी दावा करणेचे कोणतेही अधिकार नियुक्त उमेदृवारास राहणार नाहीत.

३) विहित सामाजिक प्रवर्ग वगळून आलेल्या अर्जाची नोंद घेतली जाणार नाही तसेच पात्र/ अपात्र यादीतही समावेश केला जाणार नाही. फक्त जाहिरातीत नमुद केलेल्या सामाजिक प्रवर्गातील उमेद्दवारांच्या अर्जाचा विचार केला जाईल याची उमेद्दवारांनी नोंद घेणेची आहे.

४) पदभरतीची विस्तृत जाहिरात व अर्जाचा नमुना जिल्हा परिषद, सिंधुदुर्गचे संकेतस्थळावर **www.zpsindhudurg.maharashtra.gov.in** प्रसिद्ध करणेत येणार आहे. याबाबत अर्जदारास स्वतंत्र पत्रव्यवहार केला जाणार नाही.

५) उपरोक्त पदांसाठी फक्त दिलेल्या सामाजिक प्रवर्गातील इच्छूक पात्र व्यक्तींनीं दि. ८/02/२०२१ ते दिनांक १७/02/21 ~~२०२०~~ या कालावधीतील सकाळी १०.०० ते संध्याकाळी ५. ०० वाजेपर्यंत संकेतस्थळावरील जाहिरातीत नमुद केलेल्या कागदपत्रासह व संकेतस्थळावरील अर्जाचा नमुना सुचित केलेप्रमाणे भरुन सीआरयू कक्ष ( टपाल शाखा) मुख्य प्रशासकीय इमारत, तळमजला, जि. प. सिंधुदुर्ग सिंधुदुर्गनगरी तालुका कुडाळ, जिल्हा सिंधुदुर्ग मध्ये मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.सिंधुदुर्ग यांचे नावे राष्ट्रीय आरोग्य अभियान (NHM, SINDHUDURG) व पदाचे नावाचा स्पष्ट उल्लेख करुन अर्ज सादर करावेत. जर अर्जाचे लखोटयावर राष्ट्रीय आरोग्य अभियान (NHM, SINDHUDURG) व पदाचे नावाचा स्पष्ट उल्लेख केला नसेल आणि त्यामुळे अर्ज इतर कार्यासनांकडे जाऊन उपरोक्त विहित कालावधीत प्राप्त झाला नाही, तर अर्जावर विहित कालावधीत प्राप्त नाही असा स्पष्ट उल्लेख करणेत येईल याची उमेदृवांरांनी नोंद घ्यावी.

६) खुल्या प्रवर्गातील उमेदृवारांनी रु.१५०/- व राखीव प्रवर्गातील उमेदृवारांनी रु. १००/- चा डिमांड ड्राप-ट जोडणे आवश्यक आहे. सोबत जोडलेल्या डिमांड ड्राप-टचे मागे उमेदृवाराने स्वत:चे पुर्ण नाव व ज्या पदासाठी अर्ज सादर केलेला आहे त्या पदाचे नावाचा स्पष्ट उल्लेख करावा. डिमांड ड्राप-ट SINDHUDURG DISTRICT INTEGRATED HEALTH AND FAMILY WELFARE SOCIETY Payable At OROS देय असावा. डिमांड ड्राप-ट काढतेवेळी स्पेलिंग चुक होणार नाही याची पुर्ण दक्षता घ्यावी.

७) निवड झालेल्या उमेद्दवारांना राज्य आरोग्य सोसायटीकडून प्राप्त झालेल्या अटी व शर्थी रु. 100/- चे बाँन्डपेपरवर लिहून करारनामा सादर करणे बंधनकारक आहे.

८) अर्ज प्राप्त झालेल्या उमेद्दवारांची विहित शैक्षणिक अंतिम वर्षाच्या टक्केवारीच्या 70 टक्के (70 गुण), नियमित कामकाजाचा शासकीय व निमशासकीय अनुभव (एका वर्षासाठी 4 गुण याप्रमाणे एकूण 20 गुण) व उच्च शैक्षणिक अर्हता (10 गुण) असे एकूण 100 गुण या तीन बाबींचे आधारे अंतिम गुणवत्ता यादी तयार करणेत येऊन जिल्हा परिषदेच्या संकेतस्थळावर प्रसिद्दध करणेत येईल. या यादीवर उमेद्दवारांची हरकत असेल तर पुराव्यानिशी हरकती मागवून घेणेत येतील. हरकती प्राप्त झालेनंतर त्याची विहित नोंद घेऊन अंतिम प्रतिक्षा यादी तयार करणेत येऊन सिंधुदुर्ग जिल्हा परिषदेच्या वेबसाईटला प्रसिद्दध करणेत येईल. यासाठी अर्ज सादर केलेल्या उमेद्दवारांनी सिंधुदुर्ग जिल्हा परिषदेच्या वेबसाईटचे अवलोकन करावे. वेळोवेळी प्रसिद्दध करणेत येणा-या मार्गदर्शक सुचना सिंधुदुर्ग जिल्हा परिषदेच्या वेबसाईटला प्रसिद्दध करणेत येतील.

९) प्रतिक्षा यादीचे गुणानुक्रमे व आवश्यकतेप्रमाणे नियुक्ती आदेश देणेत येतील. नियुक्ती आदेश दिलेल्या उमेद्दवारांनी हजर होणेपुर्वी आपली मुळ प्रमाणपत्रके जिल्हा शल्य चिकित्सक यांचेकडून तपासून घेणे बंधनकारक आहे.

१०) <u>वयोमर्यादा</u>- स्टाफ नर्स, तंत्रज्ञ, समुपदेशक या पदांची भरतीसाठी कमाल वयोमर्यादा 59 वर्षे व सेवा समाप्तीची मर्यादा 65 वर्षे राहिल. उर्वरीत सर्व पदांचे भरतीसाठी खुल्या प्रवर्गातील उमेद्दवारांसाठी वयोमर्यादा 38 वर्षे व राखीव प्रवर्गातील उमेद्दवारांसाठी 43 वर्षे राहिल. राष्ट्रीय आरोग्य अभियानाच्या सेवेतील कार्यरत उमेद्दवारांकरिता कमाल सेवा प्रवेश मर्यादा 5 वर्षापर्यंत शिथिल करण्यात आलेली आहे. 60 वर्षावरील अर्जदारांकरिता जिल्हा शल्य चिकित्सक प्रमाणित शारिरिक योग्यतेचे प्रमाणपत्रक ( मेडिकल फिटनेस सर्टिफिकेट) सादर करणे अनिवार्य राहिल.

११) <u>दिनांक 23/07/2020 पासून दोनपेक्षा अधिक हयात मुले असणारे उमेद्दवार भरतीसाठी अर्ज करणेस पात्र राहणार नाहीत.</u>

१२) <u>विहित सांक्षांकित प्रमाणपत्राबाबत- पदासाठी आवश्यक शैक्षणिक अर्हतेच्या शेवटच्या उत्तीर्ण वर्षाची मार्कलिस्ट व प्रमाणपत्रकांच्या साक्षांकित प्रती, उच्च शैक्षणिक अर्हतेच्या शेवटच्या उत्तीर्ण वर्षाची मार्कलिस्ट व प्रमाणपत्रकांच्या साक्षांकित प्रती, वयाचे सबळ पुराव्यासाठी शाळा सोडलेचा दाखला किंवा आधारकार्ड, कामाचे अनुभव प्रमाणपत्र, कौन्सिलचे नोंदणी प्रमाणपत्र, जात प्रमाणपत्र हे आवश्यकतेप्रमाणे सादर करणेचे आहे.</u>

१३) <u>स्टाफ नर्स या पदांची कौशल्यचाचणी झालेनंतर नियुक्ती आदेश् देणेत येतील. याची उमेद्दवारांनी नोंद घ्यावी.</u>

१४) सामाजिक प्रवर्गनिहाय गुणवत्तेनुसार प्रतिक्षा यादी करणेत येईल. योजनेतील पदांचे आवश्यकतेनुसार नियुक्ती देय राहिल.

१५) अर्ज स्वच्छ अक्षरात व खाडाखोड न करता विहित व आवश्यक प्रमाणपत्रांसहीत भरणे आवश्यक राहिल.

१६) अर्जदार हा शारिरीक व मानसिक दृष्टया सक्षम असावा तसेच अर्जदाराविरुद्दध कोणताही फौजदारी गुन्हा दाखल झालेला नसावा.

१७) उपरोक्त नमुद करणेत आलेल्या पदांबाबत विस्तृतपणे निवडीच्या अटी व शर्ती तसेच इतर आवश्यक ती सर्व जिल्हा परिषद संकेतस्थळ <u>www.zpsindhudurg.maharashtra.gov.in</u> यावर पाहण्यास उपलब्ध राहिल.

१८) शासकीय कर्मचारी यांचेवर पुर्वीच्या शासकीय कर्मचारी कार्यकाळात कुठल्याही प्रकारची प्रशासकीय/ वित्तिय कार्यवाही, दंडात्मक कार्यवाही किंवा फौजदारी अथवा इतर कुठल्याही प्रकारचे गंभीर गुन्हयाची नोंद नसावी किंवा झालेली नसावी.

१९) उपरोक्त पदे सन 2020-2021 चे जिल्हा कृती आराखडयानुसार मंजूर असुन पदांचे संख्येमध्ये कमी अगर जास्त अगर पदांचे आरक्षणामध्ये बदल होऊ शकतो याची उमेद्दवारांनी नोंद घेणेची आहे.

२०) अकरा महिन्यांचे कालावधीत एखादया संवर्गातील पद रिक्त झालेले असेल आणि त्या संवर्गाचे सामाजिक प्रवर्गातील प्रतिक्षा यादीवर उमेद्दवार उपलब्ध असतील तर त्याला नियुक्ती देण्याचे सर्व अधिकार अध्यक्ष, सिंधुदुर्ग जिल्हा एकात्मिक आरोग्य व कुटंब कल्याण सोसायटी (कार्यकारी समिती) तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सिंधुदुर्ग यांचेजवळ राखुन ठेवणेत आलेले आहेत.

२१) रिक्त पदांचे संख्येत झालेला कमी अगर जास्त झालेला बदल तसेच भरती प्रकियेतील सर्व अधिकार अध्यक्ष, सिंधुदुर्ग जिल्हा एकात्मिक आरोग्य व कुटंब कल्याण सोसायटी (कार्यकारी समिती) तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सिंधुदुर्ग यांचेजवळ राखुन ठेवणेत आलेले आहेत.

डॉ.हेमंत श.वसेकर भा.प्र.से.
अध्यक्ष
सिं.जि.ए.आ.व कु.क. सोसायटी
(कार्यकारी समिती) तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी
जि.प.सिंधुदुर्ग